महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## बारामती परिमंडळ, बारामती.

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–१८/१२/२०१८
आदेश तारीख :–२३/०१/२०१९

**आदेश**

केस क्र. २८/२०१८

१) मे.क्वालिटी इंजि.सर्व्हिसेस ( अशोक सुरेश मोरे ).,
मु.पो. गावठाण रोड, सणसवाडी,
ता. शिरुर, जि. पुणे. } तक्रार अर्जदार (ग्राहक)

**विरुध्द**

१) उप कार्यकारी अभियंता.,
म.रा.वि.वि.कं.मर्या,
केडगाव विभागीय कार्यालय. } विरुध्द पक्षकार (महावितरण)

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## तक्रारीचे स्वरुप

१) तक्रारदार ग्राहक मे.क्वालिटी इंजि.सर्व्हिस (अशोक सुरेश मोरे ) गावठाण रोड, सणसवाडी, ता. शिरुर जि. पुणे ग्राहक क्र. १८४८१००५१७३० यांनी सणसवाडी येथील बियाणी इस्पात या रोहित्राचा वीज पुरवठा खंडित झाला म्हणून व्यवसायाचे झालेले नुकसान व झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई तसेच नियमाप्रमाणे एसओपी मिळावा अशी मागणी केलेली आहे.

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

तक्रारदार (ग्राहक) मे.क्वालिटी इंजि.सर्व्हिसेस (अशोक सुरेश मोरे ) यांनी लेखी व तोंडी युक्तीवाद पुढील प्रमाणे केला. माझा ग्रा क्र. १८४८१००५१७३० हा आहे. मे. क्वालिटी इंजि.सर्व्हिसेस या नावाने व्यवसायिक वीज कनेक्शन असून सदर कनेक्शनला बियाणी इस्पात या रोहित्रावरुन विद्युत पुरवठा आहे. सदर विद्युत रोहीत्राचा विद्युत पुरवठा दिनांक. १०.५.२०१८ रोजी रात्री ९.०० वाजता बंद पडला या बाबत मी लाईन मन साळवी यांच्याशी फोनवर संपर्क करुन विद्युत रोहित्र बंद पडलेबाबत कळविले. त्यांनी डमी लाईनमन धनु यांच्याशी संपर्क करा असे सांगितले. त्यानंतर मी दिनांक १३.५.२०१८ रोजी पर्यंत वारंवार भेटून सदर रोहित्र बंद पडलेबाबत कळविले असता दि. १३.५.२०१८ रोजी साळवी व नागरगोजे हे लाईनमन आले त्यांनी विद्युत रोहित्र जाळाले असलेचे सांगितले म्हणजेच मी दि. १०.५.२०१८ रोजी केलेल्या तक्रारीचे वेळीच विद्युत रोहीत्र जळाले होते. व दुसऱ्या दिवशी दि. १४.५.२०१८ रोजी विद्युत रोहीत्र खोलून त्याच ठिकाणी ठेवून ते दुरुस्तीसाठी गाडी व क्रेनसाठी पैसे लागतील व त्यासाठी वर्गणी काढावी लागेल असे सांगितले. दोन दिवसांनी रोहित्र दुरुस्तीस पाठवले गाडीसाठी व क्रेन साठीचा खर्च सदरच्या विद्युत रोहित्राच्या ग्राहकांकडून घेतला. त्यांनतर २२.५.२०१८ रोजी विद्युत रोहित्र दुरुस्ती करुन आणले व चार्जिंगसाठी ठेवले व दिनांक २३.५.२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता वीज पुरवठा सुरु झाला. दिनांक १०.५.२०१८ ते २३.५.२०१८ या दरम्यान ३०४ तास विद्युत रोहित्र बंद होते.

विद्युत अधिनियम २००३च्या नुसार ग्रामिण भागांमध्ये विद्युत रोहित्र जळालेनंतर ४८ तासांच्या आत बदलणे बंधनकारक असताना शिक्रापुर महावितरण यंत्रणेने जाणीव पुर्वक दुर्लक्ष करुन ग्राहक हितास बाधा आणून माझे व इतर ही ग्राहकांचे तब्बल २५६ तास नुकसान केले आहे. दिनांक २८.४.२०१८ रोजी व दिंनाकं ७.५.२०१८ रोजी आलेले जॉब विद्युत रोहित्र बंद असल्यामुळे मला ते वेस्टर्न इंडिया फोर्जींग सणसवाडी यांना वेळेत देता आले नाहीत त्यामुळे माझे कधीही न भरुन येणारे नुकसान झाले. शिक्रापूर महावितरण अंतर्गत सणसवाडी येथील वर नमुद केलेले लाईनमन साळवी व नागरगोजे व कनिष्ठ अभियंता महाजन साहेब तसेच उपकार्यकारी अभियंता शिक्रापुर श्री. नितीन महाजन यांच्याशी वेळोवेळी पाठपुरावा करुन जाणीव पुर्वक तब्बल ३०४ तासानंतर विद्युत रोहित्र बसवले गेले त्यामुळे माझे व्यवसायाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले.

बियाणी इस्पात सणसवाडी हे विद्युत रोहित्र बंद असल्यामुळे माझे १०.५.२०१८ ते २३.५.२०१८ पर्यंत झालेले नुकसान सुमारे एक लाख दहा हजार रुपये झाले आहे. विद्युत रोहित्र बंद असल्यामुळे कंपनीच्या

येणाऱ्या ऑर्डर मी स्विकारु शकलो नाही. त्यामुळे एक लाख रुपये नुकसान झाले आहे. शिवाय या सर्व प्रकारामुळे मनस्तापापोटी ५० हजार रुपये तसेच अर्ज दाखल करणेसाठी ५०००/– रुपये खर्च झाला. विद्युत अधिनियम २००३ नुसार ४८ तासांनंतर प्रत्येकतासा प्रमाणे व्यवसायिक नुकसान भरपाई मिळावी. असे एकूण सर्व मिळून रु २,७५, ०००/– (रुपये दोन लाख पंचाहत्तर हजार) ऐवढी नुकसान भरपाई मिळावी. ही विनंती.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी व लेखी युक्तीवाद

श्री. राजेंद्र येडके, कार्यकारी अभियंता, महावितरण, केडगाव विभाग आणि नितीन महाजन उपकार्यकारी अभियंता, महावितरण, शिक्रापुर सब डिव्हीजन यांनी लेखी व तोंडी युक्तीवाद पुढील प्रमाणे केला. सणसवाडी येथील बियाणी इस्पात हे रोहित्र दिनांक १३.५.२०१८ रोजी नादुरुस्त झाल्याचा अहवाल केडगाव येथे १४.५.२०१८ रोजी प्राप्त झाला. नादुरुस्त रोहित्रावरील ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी दरम्यानच्या काळात शाखा कार्यालयाकडून नजीकच्या रोहित्रावरुन एक फेज सुरु करुन वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला.

गाळणी कक्षात रोहित्र उपलब्ध झाल्यावर दि. १६.०५.२०१८ रोजी सदर रोहित्र बदलण्यात आले वीज पुरवठा मानके एसओपी क्र. ६.४ नुसार वीज रोहित्र नादुररुस्त झाल्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाल्यास सदर वीज पुरवठा ग्रामिण भागात ४८ तासात पुर्ववत करण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने दि. १६.५.२०१८ रोजी सदर ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला होता. परंतू संबधीत वीज रोहित्र त्याच दिवशी नादुरुस्त झाल्यामुळे व रोहित्र उपलब्ध नसल्यामुळे दि. २२.५.२०१८ रोजी नविन रोहित्र बसवून ग्राहकांचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला.

सदर ग्राहकाने महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळ (वीज पुरवठा मानके) अधिनियम २०१४ नुसार नुकसान भरपाई मिळणेकरीता केलेला अर्ज जाबदेणार यांना मान्य नाही. कारण सदर वीज पुरवठा रोहित्र उपलब्ध झाल्यानंतर विनाविलंब सुरळीत करण्यात आला आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळ (वीज पुरवठा मानके) अधिनियम २०१४ क्र. १२ नुसार सदर ग्राहक तक्रार मा. मंचासमोर वीज पुरवठा चालु केल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर तक्रार फेटाळण्यात यावी अशी मंचाकडे विनंती केली.

## कारणमिमांसा

१) तक्रारदार (ग्राहक) यांनी लेखी म्हणण्यामध्ये बियाणी इस्पात रोहित्राचा विद्युत पुरवठा दि. १०.५.२०१८ रोजी बंद पडला याबाबत लाईनमन साळवी यांच्याशी फोनवर संपर्क करुन रोहित्र बंद पडल्याचे कळविले. त्यांनी डमी लाईनमन धनु यांच्याशी संपर्क करा असे सांगितले. त्यानंतर दि. १३.५.२०१८ पर्यंत वारंवार भेटून कळविले असता दि. १३.५.२०१८ रोजी साळवी व नागरगोजे हे लाईनमन आले त्यांनी विद्युत रोहित्र जळाले असल्याचे

सांगितले. तसेच कागदपत्राचे अवलोकन करता तक्रारदार यांनी उपकार्यकारी अभियंता उपविभाग शिक्रापूर यांचेकडे दि. १४.५.२०१८ च्या दाखल केलेल्या अर्जावरुन असे दिसून येते की, बियाणी इस्पात हे रोहित्र दि. १०.५.२०१८ रोजी रात्री ९ वाजता बंद पडले. दि. १०.५.२०१८ रोजी रात्री ९ वाजलेपासून सदर ग्राहकाचा वीज पुरवठा बंद झाला अशी मंचाची खात्री झाली आहे.

दिनांक १३.५.२०१८ रोजी साळवी व नागरगोजे यांनी रोहित्र जळाले असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी विद्युत रोहित्र खोलून त्याच ठिकाणी ठेवून दुरुस्तीसाठी गाडी व क्रेन साठी पैसे लागतील त्यासाठी वर्गणी काढावी लागेल असे सांगितले व दोन दिवसांनी रोहित्र दुरुस्तीस पाठविले. गाडीसाठी व क्रेनसाठीचा खर्च रोहित्राच्या ग्राहकाकडून घेतला या सबंधीची लेखी तक्रार ग्राहकांने संबधीत कार्यालयाकडे दाखल केल्याचा पुरावा कागदपत्राचे अवलोकन केले असता आढळून येत नाही. त्यामुळे दुरुस्तीसाठी गाडी व क्रेनसाठी पैसे लागतील वर्गणी काढावी लागेल गाडीसाठी व क्रेन साठीचा खर्च रोहित्राच्या ग्राहकांकडून घेतला हे तोंडी म्हणणे ग्राहय धरता येणार नाही.

कार्यकारी अभियंता केडगाव यांनी सादर केलेल्या लेखी म्हणण्यानुसार सणसवाडी येथील बियाणी इस्पात हे रोहित्र दि. १३.५.२०१८ रोजी नादुरुस्त झाल्याचा अहवाल केडगाव येथे दि. १४.५.२०१८ रोजी प्राप्त झाला. नादुरुस्त रोहित्रावरील ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी शाखा कार्यालयाकडून नजीकच्या रोहीत्रावरुन एक फेज सुरु करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला शाखा कार्यालयाकडून एक फेज वीज पुरवठा सुरु केला ही स्त्युत्य बाब आहे. परंतू तक्रारदार यांचा थ्री फेज वीज पुरवठा सुरु करण्यात असमर्थ ठरले हे यावरुन दिसून येते.

गाळणी कक्षात रोहित्र उपलब्ध झाल्यानुसार दि. १६.५.२०१८ रोजी सदर रोहित्र बदलण्यात आले वीज पुरवठा मानके एसओपी क्र. ६.४ नुसार वीज रोहित्र नादुरुस्त झाल्यास सदर वीज पुरवठा ग्रामिण भागात ४८ तासात पुर्ववत करण्याची तरतुद आहे. त्या अनुषंगाने दि. १६.५.२०१८ रोजी सदर ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला होता. परंतू संबधीत वीज रोहित्र त्याच दिवशी नादुरुस्त झाल्यामुळे व रोहित्र उपलब्ध नसल्याने दि. २२.५.२०१८ रोजी नवीन रोहित्र बसवून ग्राहकाचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात आला असे म्हटले आहे. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाच्या निकालामध्ये महावितरण कंपनी प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान मांडलेल्याबाबी मध्ये दि. १६.५.२०१८ रोजी २०० केव्हीचे रोहित्र मिळाले व ते हमीगंवर ठेवण्यात आले असता सदोष आढळल्यामुळे दुसरे रोहित्र दि. २२.५.२०१८ रोजी बसवण्यात आले यावरुन असे दिसून येते की, दि. १६.५.२०१८ रोजी तक्रारदार ग्राहकांचा वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला होता. हे म्हणणे पुर्णपणे चुकीचे आहे.

तक्रारदार ग्राहकाचा वीजपुरवठा दि. १०.५.२०१८ रात्री ९ वाजलेपासून ते दि. २३.५.२०१८ दुपारी १ वाजेपर्यंत खंडीत राहिला त्यानुसार विद्युत अधिनियम २००३ नुसार ४८ तासानंतर प्रत्येक तासाप्रमाणे नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.

**Maharashtra Electricity Regulatory commission (Standards of performance of Distribution Licensees period for giving supply and Determination of compensation) Regulations 2014 मधील 2 Restoration of supply तरतुद (iv) Distribution transformer failure standard forty**

eight (48) hours (Rural Areas) compensation payable Rs. 50 per hour or part of the delay नुसार दि. १०.५.२०१८ ते दि. २३.५.२०१८ या कालावधीतील एसओपी मिळणेस ग्राहक पात्र आहे.

तक्रारदार ग्राहक यांनी वीज पुरवठा खंडीत राहिल्यामुळे दि. १०.०५.२००१८ ते २३.०५.२०१८ पर्यंत झालेले नुसकान सुमारे एक लाख रुपये, रोहित्र बंद असल्यामुळे कंपनीच्या ऑर्डर स्वीकारु शकलो नाही. यापोटी एकलाख रुपये, मनस्तापापोटी पन्नास हजार रुपये, खर्चापोटी रुपये ५०००/— असे एकूण दोन लाख पंचावन्न हजार रुपये नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे. अशी नुकसान भरपाई देण्याची तरतुद मंचाकडे नाही. त्यामुळे मागणी मान्य करता येत नाही.

महावितरण जाब देणार यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळ (वीज पुरवठा मानके ) अधिनियम २०१४ क्र. १२ सदर ग्राहक तक्रार मा. मंचासमोर वीज पुरवठा चालु केल्यापासून ६० दिवसाच्या आत करण्यात आलेली नाही. त्यामुळे तक्रार फेटाळण्यात यावी. अशी मागणी केलेली आहे. कागदापत्राचे अवलोकन करता तक्रारदाराने वेळेत तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे महावितरण/जाबदेणार यांची मागणी मान्य करता येत नाही. मंच खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**१) तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.**

**२) दिनांक १०.०५.२०१८ ते २३.०५.२०१८ या कालावधीतील एस.ओ.पी. नुसार नियमाप्रमाणे भरपाई देण्यात यावी.**

**३) या आदेशाची अंमल बजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या मंचास या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.**

**४ ) या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांनी आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा—कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.**

**(श्री. बी. डी. गायकवाड)**
**अध्यक्ष**

**(श्री. एस. के. जाधव )**
**ग्राहक सदस्य,**

**(श्री. एम. ए. लवटे )**
**सदस्य सचिव**